# पतसंस्थांसाठी सहकार आयुक्तांचे परिपत्रक

दिनांक २३/१२/२०१० रोजी महाराष्ट्र राज्याच्या मा. सहकार आयुक्तांनी राज्यातील सुमारे १६३४५ नागरी सहकारी पतसंस्थांसाठी अत्यंत महत्वाचे असे परिपत्रक जाहीर केलेले आहे. नागरी सहकारी पतसंस्थांमधील ठेवीदारांच्या रकमा तसेच जिल्हा बँकांकडून घेतलेली कर्जे सुरक्षित राहण्यासाठी पतसंस्थांची तरलता नियंत्रीत राहणे आवश्यक असल्यामुळे हे परिपत्रक लागू केलेले आहे. (पतसंस्था परिवारच्या ह्या अंकात सदरहू परिपत्रक प्रसिध्द केलेले आहे.)

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० या कायद्यानुसार बाहेरून कर्ज उभारण्याची मर्यादा कलम ४३ व नियम ३५,३६,३७,३८,३९,४० मध्ये स्पष्टपणे समाविष्ठ केलेली आहे. पतसंस्थांनी सभासदांकडून जमा केलेल्या ठेवी व जिल्हा बँकांकडून घेतलेली कर्जे या दोन्ही रकमांची बेरीज स्वनिधीपेक्षा (संचीत तोट्याच्या रकमा वजा केल्यानंतर) १० पटीपेक्षा जास्त असणार नाही, अशी तरतूद आहे. म्हणजेच ''मर्यादत जबाबदारी असलेल्या उदा. नागरी सहकारी पतसंस्था निबंधकाची पुर्व मंजूरी घेतल्याशिवाय, आपले भरणा झालेले भाग-भांडवल, संचित राखीव निधी आणि इमारत निधी यातून संचीत तोट्याच्या रकमा वजा जाता शिल्लक राहिलेल्या रकमेच्या एकूण १० पटीपेक्षा अधिक होईल इतक्या रकमेची जबाबदारी पत्कारणार नाहीत.''

ह्या परिपत्रकातील आशयावरून नागरी सहकारी पतसंस्थांना सहकार कायद्यात असलेली तरतूद जाणीवपूर्वक लक्षात आणून देवून त्यांचे तंतोतंत पालन करणेसाठी हे परिपत्रक काढल्याचे दृष्टीक्षेपात येते. भारतीय रिझर्व्ह बँकेने सहकारी बँकांकरीता बँकेच्या ठेवीदारांना बचत खाती उघडताना तसेच ठेवी स्विकारताना ठेवीदारांची पुर्ण माहिती प्राप्त होण्याकरिता '' K. Y. C'' (Know Your Customer) जे नियम लागू केलेले आहेत, त्याच धर्तीवर नागरी सहकारी पतसंस्थांनी देखील त्याची अंमलबजावणी करावी असे म्हंटलेले आहे. त्या '' K. Y. C'' चे नियम पतसंस्थांनी अंमलात आणण्यासाठी ज्या बाबी आवश्यक व बंधनकारक आहेत त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

१. नागरी सहकारी पतसंस्थांनी सभासदांची बचत खाती उघडताना, विविध प्रकारच्या ठेवी स्विकारताना **खालील बाबींपैकी कोणतेही एक** तपासून घेवून एक झेरॉक्स (प्रमाणित) प्रत घेणे आवश्यक आहे.

१) पासपोर्ट, २) पॅनकार्ड, ३) निवडणुक ओळखपत्र, ४) ड्रायव्हिंग लायसन्स, ५) आयकार्ड (वैधानिकदृष्टया सक्षम अधिकाऱ्याचे), ६) शासकीय अधिकारी / लोकप्रतिनिधी / ग्रामसेवक यांचे सहीचे ओळखपत्र ज्यामध्ये ठेवीदाराची ओळख व त्याचे राहण्याचे ठिकाण निश्चित समजेल असे, ७) टेलीफोन बिल, ८) लाईट बील, ९) रेशन कार्ड यांची मूळ कागदपत्रे तपासून (पतसंस्थेची खात्री होईल असे वरील कोणतेही कागदपत्र)

२. सभासदांचा पत्त्याच्या पुराव्याकरिता **खालीलपैकी कोणताही एक पुरावा** तपासून एक झेरॉक्स (प्रमाणित) प्रत घेणे आवश्यक आहे.

१) क्रेडीट कार्ड स्टेटमेंट, २) पगाराची पावती (पत्यासह असलेली), ३) आयकर / संपत्तीकर मुल्यांकन आदेश (Income tax / wealth tax assessment order) ४)कोणत्याही मान्यताप्राप्त जनप्राधिकाऱ्याचे पत्र, ५) बँक विवरण पत्र (Bank account statement) ६) प्रतिष्ठित अधिकृत मालकाद्वारे दिले गेलेले पत्र.

३.	जेष्ठ नागरिकांकरीता वरीलपैकी कोणतीही कागदपत्र नसल्यास त्यांचा फोटो असलेले जेष्ठ नागरीक ओळखपत्र, किंवा ग्रामसेवक यांचे स्वाक्षरीचे ओखळपत्र.

**४.	रू. ४९,९९९/- च्या पुढील ठेवी काढताना अथवा ठेवताना पॅन कार्ड तपासणे आवश्यक आहे.**

**५.	एखाद्या सभासदाने रू. ५.०० (पाच) लाखांपेक्षा जास्त रक्कम खात्यावर भरल्यास ती आयकर खात्याला कळविणे आवश्यक आहे.**

यावरून आपल्या लक्षात येईल की, राज्यातील सर्व नागरी सहकारी पतसंस्थांनी येथुन पुढे सहकारी बँकांप्रमाणेच काम करणेसाठी राज्याचे मा. सहकार आयुक्त जोर देत आहेत. पतसंस्थांनीही ही बाब ठेवीदार व सभासदांच्या १०० टक्के हिताची आहे, याविषयी आपले स्वत:चे मत सहकारातील कार्यकर्ता म्हणून स्विकारल्याशिवाय पर्याय नाही, हे समजून घतले पाहिजे. अन्यथा पतसंस्थांना भविष्यात मोठ्या संकटांना सामोरे जावे लागेल.

पतसंस्था, नागरी सहकारी बँका व जिल्हा मध्यवर्ती बँका यांच्याकडे बघताना सरकारची भूमिका व आरबीआय ची भूमिका यामध्ये फार मोठी तफावत आहे. ज्यावेळेस राज्यातील **नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आर्थिक अडचणीत आली,** त्यावेळेस **महाराष्ट्र राज्य सरकारने सर्व कायदे पायदळी तुडवून, भारताचे संविधान सुध्दा झिडकारून, ११६ कोटी रूपये अक्षरश: अनुदानाच्या नावाखाली देणगी म्हणून दिले.** हि या देशामधील प्रामुख्याने महाराष्ट्र राज्यातील सहकाराच्या दृष्टीने मोठी चिंताजनक बाब नोंदली गेलेली आहे. कारण राज्यातील आणखी अनेक जिल्हा मध्यवर्ती बँका, नागरी सहकारी बँका व नागरी सहकारी पतसंस्था आर्थिक अडचणीत असताना, त्यांना मात्र ह्याच मायबाप सरकारने नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेप्रमाणे मदतीसाठी रकमा दिल्या नाहीत. म्हणजेच देशातील संपत्तीचे म्हणजेच जनतेच्या खिशातून कर रूपाने जमा केलेल्या रूपयांचे नियोजन व वाटप हे राज्य सरकार संविधान तोडून करते. तसेच त्यामध्ये समानता सुध्दा राहिली नाही. आणि ही बाब केवळ महाराष्ट्र राज्य नव्हे तर संपुर्ण भारत **देशाच्या अर्थव्यवस्थेला भविष्यात धक्का पोहोचविणारी** व काहीतरी विशेष परिणामाची नांदीच ठरणार, असेच चित्र उभे राहिले आहे.

म्हणून राज्यातील नागरी सहकारी पतसंस्था ही सहकारातील अत्यंत संवेदनशील व छोट्या कार्यकर्त्यानी उभी केलेली सहकारी चळवळ, ह्याकडे राज्यकर्ते जाणिवपुर्वक दुर्लक्ष करीत आहेत. राज्याचे मा. सहकार आयुक्त हे सहकार कायद्याची अंमलबजावणी करताना अनेक बाबींमध्ये सापत्नपणाची भूमीका बजावित आहेत. नुकतेच मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक ०६/१०/२०१० च्या आदेशानुसार जे परिपत्रक राज्याच्या मा. सहकार आयुक्तांनी पतसंस्थांना लागू केले, त्यामध्ये तर उघड-उघडपणे भारतीय संविधानाचे उल्लंघन तसेच सहकार कायद्याचे उल्लंघन, एवढेच नव्हे तर मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान करणारे ऑडीटच्या संदर्भातील परिपत्रक भविष्यातील भ्रष्टाचाराला व मुजोरीपणाला आमंत्रणच असेल. अशा प्रकारची विद्यमान स्थिती राज्यात आहे. सरकार व सरकारचे प्रतिनिधी उदा. मा. सहकार आयुक्त व मा. साखर आयुक्त व त्यांच्याखालील यंत्रणा सहकाराच्या बाबतीत कुठलाही निर्णय घेताना भांबावलेल्या स्थितीत वाटतात. भारतीय

रिझर्व्ह बँक सुदैवाने या देशातील आम जनतेचे आर्थिक संरक्षण नि:पक्षपाती करते व अर्थव्यवस्थेवर नियंत्रण सुध्दा ठेवते. त्यामुळेच या देशातील १११ कोटी जनता भारतीय रिझर्व्ह बँकशी कृतज्ञता व्यक्त करते.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!